# Tarun Bharat

## Doctor Unique Movement

**Date: 28/08/2013 | Edition: Mumbai | Page: 7 | Source: Bureau | Clip size (cm): W: 9 H: 15**

**Clip: 1 of 1**


# यूजी आणि पीजीच्या सीट्सची संख्या समान करा

## मेडिकलच्या विद्यार्थ्यांची मागणी




**मुंबई, दि.२७(प्रतिनिधी):** जवळपास ३०० हून अधिक मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी आयएमए हाऊसकडे एकत्र जमून पुन्हा एकदा केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला अंडर ग्रॅज्युएट (यूजी) आणि पोस्ट ग्रॅज्युएट (पीजी) मेडिकल सीट्सची संख्या समान करण्याची मागणी केली.

मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी सेव्ह द डॉक्टर ही चळवळ एकाच दिवशी बंगळुरू, जयपूर, हैद्राबाद, म्हैसूर, गोहत्ती आणि हिस्सार या शहरांमध्येही हाती घेतली. नेहमीचा लॅब कोट घालून काळ्या फिती लावलेल्या या विद्यार्थ्यांनी एका भव्य कॅनव्हासवर आपले हाताचे ठसे उमटवले. देशामध्ये स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या टंचाईकडे लक्ष वेधण्यासाठी हे सूचन करण्यात आलं. या विद्यार्थ्यांनी जमिनीवर 'सेव्ह द डॉक्टर' असा संदेश देऊन त्यातील प्रत्येक अक्षर मेणबत्तीने उजळवलं.